जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
जिल्हा परिषद कोल्हापूर
पत्ता - जुनी प्रशासकिय इमारत नागाळा पार्क कोल्हापूर
फोन नंबर - (०२३१) २६५१०४४,
ई मेल आयडी - dwsmkolhapur@gmail.com

---

जा.क्र.जिपको/DWSM/कावि- /१७२२-२२/२०१७ दिनांक: १४/०७/२०१७

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,गडहिंग्लज

विषय-घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन उपक्रमांतर्गत प्लास्टीक संकलनाबाबत. . . .
संदर्भ-मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दि.११/०७/२०१७ रोजीच्या तोंडी सुचना

वरील विषयान्वये आपल्या गटाकडील ग्रा.प.मध्ये प्लास्टीक संकलानाचा स्तुत्य उपक्रम राबविला असुन या उपक्रमातंर्गत ग्रा.प.स्तरावरती प्लास्टीक संकलन केले आहे.सदर संकलित केलेल्या प्लास्टीक बाबत यापुर्वी आपणास दिलेल्या सुचनेनुसार एकटी संस्था,कोल्हापूर कडे सदर प्लास्टीक देणे आवश्यक होते.सदर वाहतुकीचा खर्च जिल्हास्तरावरुन देणेत येणार नाही याबाबत ही आपणस सुचित केले आहे.

सबब आपण संकलित झालेल्या प्लास्टीक बाबत आपले स्तरावरुन रिकाम्या खणीमध्ये किंवा इतर ठिकाणी भुमीभरावाकरिता वापरावे किंवा आपल्या स्तरावरुन संस्था किंवा प्लास्टीक गोळा करणा-यांना देणेत यावे.

तसेच वरील संदर्भान्वये मा.मुकाअ यांनी आपण सदर प्लास्टीक गोळा करण्यापुर्वी गोळा झालेल्या प्लास्टीक चे व्यवस्थापनबाबतचे नियोजन करुन वरील उपक्रम नियोजनपुर्वक व सातत्याने करावा.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता)
जिल्हा परिषद,कोल्हापूर

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा.सभापती,पंचायत समिती,गडहिंग्लज
प्रत-आवश्यक कार्यवाहीसाठी
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,------------------------सर्व